**ठळक बातम्या**

- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- दहशतवादाविरोधात भारताच्या भूमिकेला कोलंबियाचा पाठिंबा, पाकिस्तानाच्या समर्थनार्थ केलेलं विधान मागे घेतलं

- मिझोराममध्ये लाँगटलाई शहरात मुसळधार पावसामुळे भूस्खलन होऊन काही इमारती कोसळल्या, अनेकजण दगावल्याची भीती

**आणि**

- मंगोलिया इथे आयोजित ‘उलान बातर २०२५ कुस्ती स्पर्धेत भारतीय कुस्तीवीरांची ४ सुवर्णपदकांची कमाई

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची आज गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज भोपाळ इथं आयोजित ‘देवी अहिल्यादेवी होळकर महिला सशक्तीकरण महासंमेलनात’ बोलत होते. अहिल्यादेवींचं नाव ऐकताच मनात श्रद्धाभाव निर्माण होतो आणि कोणत्याही कठीण परिस्थितीत  राज्य, कसं पुढे न्यायचं हे त्यांच्याकडून शिकण्यासारखं आहे, असं ते यावेळी म्हणाले. अहिल्यादेवींनी एक उत्तम प्रशासक आणि लोकशाहीचं उत्तम प्रमाण सादर केलं. जलसंवर्धनाचं महत्व अधोरेखित करत त्यांनी अनेक धार्मिक स्थळांचा उद्धार केला आणि तीनशे वर्षांपूर्वीच्या गुलामगिरीच्या काळात सशक्त राज्य उभारत स्त्री शक्तीचा समाजासमोर आदर्श ठेवला, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. अहिल्याबाईंच्या स्मरणार्थ आज एका टपाल तिकिटाचं आणि

विशेष नाण्याचंही मोदी यांच्या हस्ते प्रकाशन झालं. तसंच अनेक प्रकल्पांचं आणि योजनांचं लोकार्पण यावेळी करण्यात आलं. तर इंदूरच्या मेट्रो स्थानकाचं त्यांनी यावेळी दूरस्थ प्रणालीद्वारे उद्घाटन केलं. या कार्यक्रमाला मध्यप्रदेशचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्टात अहिल्यानगर जिल्ह्यात लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं जन्मस्थान असलेल्या चौंडी इथं आज त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एक विशेष कार्यक्रम होत आहे. यानिमित्त चौंडी इथं विविध विकास कामांचं उद्घघाटन करण्यात येईल.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षिय शिष्टमंडळ वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत.

काँग्रेस खासदार शशि थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज कोलंबियाच्या परराष्ट्र व्यवहार उपमंत्री रोझा योलांडा व्हिलाविचेंसिओ यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान पाकिस्तानबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या कोलंबियाच्या विधानावर थरूर यांनी नाराजी व्यक्त केली. मात्र भारताच्या भूमिकेला कोलंबियानं पाठिंबा दिला असून हे विधान मागे घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं सिएरा लिओनचा दौरा पूर्ण केला. शिष्टमंडळाने संसदेचे सभापती, उपसंरक्षण मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा समन्वयक, यांच्यासह सिएरा लिओनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

द्रमुक खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं लाटवियामधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये आज संध्याकाळी पाच वाजता ‘व्यापक नागरिक सुरक्षा मॉक ड्रील’ आयोजित करण्यात येणार आहे. आपत्कालीन इशाऱ्यांचं अनुकरण करत जम्मू काश्मिरमध्ये अनेक ठिकाणी यावेळी सायरन सक्रीय केले जातील. मॉक ड्रीलमध्ये नियंत्रित

हवाई हल्ल्यांदरम्यान सायरन सक्रीय करणं, नागरी परिसरात ब्लॅकआऊट प्रोटॉकॉल आणि ड्रोन हल्ल्यांच्या स्थितीत सैनिकी छावणी जवळून कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवणं तसंच आपत्कालीन परिस्थितीत उपाय योजना करणं आदींचा यात समावेश आहे.

**<><><><>**

मिझोराममध्ये लाँगटलाई शहरात मुसळधार पावसामुळे भूस्खलन होऊन झालेल्या दुर्घटनेत काही इमारती कोसळल्या आहेत. या इमारतीत अनेक रहिवासी अडकून त्यांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही दुर्घटना काल रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमाराला घडली. एसडीआरएफची पथकं तसंच थर्ड इंडियन रिझर्व्ह बटालियनचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी बचावकार्य सुरू केलं आहे. मुसळधार पावसामुळे बचावकार्यात अडथळे येत आहेत.

**<><><><>**

मंगोलिया इथे आयोजित ‘उलान बातर २०२५ कुस्ती स्पर्धेत’ भारतीय कुस्तीवीरांनी काल ४ सुवर्णपदकांसह एकूण सहा पदकं पटकावली. पॅरिस २०२४ ऑलिम्पिक पदक विजेती अंतिम पंघालनं ५३ किलो वजनी गटात आपल्या प्रतिस्पर्ध्यावर १०-० अशा मोठ्या फरकानं विजय मिळवला. ५७ किलो वजनी गटात नेहा संगवाननं, बोलोरतुया खुरेलखू या ऑलिम्पिक पदक विजेतीवर ४-० अशी मात करत सुवर्णपदक पटकावलं. तर, मुस्काननं ५९ किलो आणि हर्षितानं ७२ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. याव्यतिरिक्त, पुरुषांच्या ग्रीको-रोमन ६० किलो वजनी गटात सुरज यानं रौप्य तर महिलांच्या ५० किलो फ्रीस्टाईल गटात निलमनं कांस्य पदक पटकावलं.

**<><><><>**

दक्षिण कोरियात चांगवॉन इथं झालेल्या दिव्यांगांच्या नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत महिलांच्या पी टू - १० मीटर एअर पिस्तुल एसएच वन प्रकारात भारताच्या मोना अग्रवाल हिने रौप्य पदक जिंकलं आहे. २०२४ च्या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेतली कांस्यपदक विजेती अवनी लेखरा हिचं पदक थोडक्यात हुकलं आणि तिला या स्पर्धेत चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

**<><><><>**

सिंगापूर इथे सुरू असलेल्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी प्रकारात भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचा सामना आज मलेशियाच्या आरोन चिया आणि वुई यिक सोह यांच्याशी होईल. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी तीन वाजता सुरू होईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं गुजरात टायटन्सचा वीस धावांनी पराभव केला. मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या, प्रत्युत्तरादाखल गुजरात टायटन्स २०८ धावा करू शकला. क्वालिफायर टू मध्ये आता पंजाब किंग्स विरुद्ध मुंबई इंडियन्स यांचा सामना उद्या अहमदाबाद इथं होणार आहे. या दोन्ही संघातील विजेता 3 जून रोजी अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूविरुद्ध खेळेल.

<><><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा चेक जोडीदार ॲडम पावलासेक यांनी तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या फेरीत त्यांनी फॅबियन रेबोयूल आणि सॅडिओ ड्युम्बिया या प्रतिस्पर्धी जोडीवर ७-६, ६-२ अशा गुण फरकाने विजय मिळवला.

<><><><><>

मिस वर्ल्ड २०२५ स्पर्धेची अंतिम फेरी आज संध्याकाळी हैदराबादमध्ये होणार आहे. या स्पर्धेत अमेरिका, आफ्रीका, यूरोप, आशिया खंडांमधल्या विविध देशांच्या १०८ सौंदर्यवती सहभागी होत आहेत. स्पर्धेत भारताच्या नंदिनी गुप्तासह १६ सौंदर्यवतींनी टॉप ४०मध्ये आपलं स्थान  निश्चित केलं आहे. निर्णायक मंडळ अन्य २४ सौंदर्यवतींची निवड करतील. प्रत्येक खंडातून दोन जणींची निवड होईल आणि अंतिम फेरीत केवळ चार सौंदर्यवतींना अंतिम प्रश्न विचारले जातील.

//<><><><><>//